
# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२**

**Ph. :0253-2231714,15 Ext 2002 http://-ycmou.digitaluniversity.ac**

**e-mail : mwkchair@ycmou.ac.in**

**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन**

---

**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव **विषय :** माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा इतिवृत्त...

**प्रति :** मा. कुलगुरू **दिनांक :** ०६/०३/२०२४

---

डॉ. ए.पी.जी अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन पंधरवडा निमित्त. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, संवाद पत्रिका व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने **"माझे वाचन निबंध लेखन"** स्पर्धा दि. २६/१०/२०२३ भारतीय सौर कार्तिक ४ शके १९४५ रोजी. विद्यापीठातील सर्व सहकारी वृंदासाठी आयोजित केली होती. या स्पर्धेच्या उद्देश विद्यापीठातील सर्व सहकारीवृंदाना वाचनसाठी प्रेरित करून त्यांच्यात सकारत्मक भव वाढीस लावणे हा होता. शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय यासाठी विशेष प्रयत्नशील आहे. सकाळी १०.०० ते दुपारी ०१.३० पर्यंत येथे ग्रंथाची देवाण घेवाण होत असते. याचा ही परिचय विद्यापीठातील सहकारीवृदांना या निमित्ताने करून देण्यात आला मा. कुलसचिव यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे सर्वांना सहभागी होण्याचे सूचित केले होते. या स्पर्धेत एकूण १५ सहकारीवृदांनी सहभाग नोंदवला. परीक्षणासाठी परीक्षक म्हणून डॉ. मधुकर शेवाळे, ग्रंथपाल व श्री. प्रेमनाथ सोनवणे, नोंदणी कक्ष यांनी परीक्षण केले. त्यामध्ये पुढील चार विभागात पारितोषिके ग्रंथ व प्रमाणपत्र स्वरुपात देण्यात आले. या स्पर्धेत गुणानुक्रमे पुढीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली. १. नियमित कर्मचारी गट: प्रथम श्री. टी. के. सोनवणे, द्वितीय श्री. रावेंद्र सोनवणे. २. दैनंदिन वेतनावरील कर्मचारी गट: प्रथम श्रीम. स्वरांजली जाधव, द्वितीय श्रीम. नूतन रावेंद्र साळवे, तृतीय श्रीम. मंगल उत्तम निंबेकर. ३. बी. बी. ए अध्ययनार्थी गट: प्रथम श्रीम. निपळूंगे श्रद्धा अमरनाथ, द्वितीय श्रीम. प्राजक्ता सुनील लोणारे, तृतीय श्रीम. कोमल मयुरेश साळुंके, ४. अभ्यासकेंद्र कर्मचारी गट श्री. प्रमोद एन. पठारे. या स्पर्धेसाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या संचालक, प्रा. डॉ. संजीवनी राजेश महाले, गुणश्री प्रा. डॉ. कविता साळुंके, कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी विशेष मार्गदर्शन केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्रीम. राधिका शिंदे, श्री. पंकज करंजकर, श्री. नितीश जाधव यांनी सहकार्य केले.

याचे सविस्तर मान्यता पत्रे, परीक्षक निकाल, प्रस्ताव, वृत्त व प्रकाशचित्रे पुढीलप्रमाणे परिशिष्टात सादर....

## मा. कुलगुरू/ कुलसचिव मान्यता प्रस्ताव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

**अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet**

जा.क्र. 961
दिनांक १४/१०/२०२३
आ.क्र...........
दिनांक...........
जा.क्र.............
दिनांक...........
आ.क्र...........
दिनांक...........
कुलसचिव कार्या.
जा.क्र.............
दिनांक...........
कुलसचिव कार्या.
आ.क्र...........
दिनांक...........
कुलगुरु कार्यालय
जा.क्र.............
दिनांक...........
कुलगुरु कार्यालय
आ.क्र...........
दिनांक...........
जा.क्र.............
दिनांक...........
आ.क्र...........
दिनांक...........

**प्रेषक :** प्रा. विजयकुमार पाईकराव  **विषय:** वाचन निबंध लेखन स्पर्धेबाबत.....

**प्रति :** मा. कुलसचिव  **दिनांक :** १४/१०/२०२३

डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम जयंती, वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यापीठातील सर्व सहकारीवृंद (अध्ययनार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद) यांच्यासाठी, वाचन व लेखनातून समस्या निराकरण व्हावे म्हणून, शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने **"माझे वाचन निबंध लेखन"** स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानस आहे.

**त्याचा तपशील पुढीलप्रमाणे**

१. विषय: माझे वाचन .
२. वेळ: १ तास.
३. निबंध लेखकांनी स्वतः शैक्षणिक इमारतीच्या सभागृहात किंवा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सहविचार सभागृहात १ तास स्वतः लेखन करणे अपेक्षित आहे.
४. गुणवत्तापूर्ण निबंधास प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिके ग्रंथ रुपात व प्रमाणपत्र स्वरूपता देण्यात येतील.
५. प्रमाणपत्रे रंगीत कागदावर ग्रंथनिर्मिती केंद्रातून प्रिंट करून घेण्यात येतील.
६. स्पर्धा पुढील आठवडयात घेण्यात येईल.

**प्रस्ताव:** "माझे वाचन निबंध लेखन" स्पर्धा शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यास मान्यता द्यावी. ही विनंती, आदर व आभारासह !!!

प्रा. विजयकुमार पाईकराव
कार्यकारी संपादक

मार्फत: प्रोफेसर संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

16/10/2023

मान्य/ अमान्य

मा. कुलसचिव

कुलसचिव कार्यालय
आवक क्र. 3363
दिनांक : 16/10/2023

## परिपत्रक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_edu@ycmou.digitaluniversity.ac  दूरध्वनी Telephone : (0253) 2231472

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा / School of Education**

शि.शा.वि/2023/  दिनांक: 18/10/2023

**परिपत्रक**

आपल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व सहकारीवृन्दांत प्रचंड क्षमता व सामर्थ्य आहे. सहकारीवृन्दांनी आपल्या या क्षमता व सामर्थ्याचा सर्वार्थाने अध्ययनार्थी विकासाठी वापर करण्यासाठी दैनंदिन कार्यनंदा बरोबरच, वाचन करून स्वतःला अद्यावत ठेवणे गरजेचे आहे. विद्यापीठातील अनेक सहकारीवृंद त्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचे उदाहरणे आहेत, ही अत्यंत दिलासादायक बाब आहे. त्यामुळे **माझे वाचन** या विषयी सर्वांसाठी उत्सपूर्त निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन **दि. २६ ऑक्टोबर २०२३, भारतीय सौर कार्तिक ४ शके १९४५ रोजी दु. ०४.०० ते दु. ०५.००** या वेळात केले आहे.

डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम जयंती, वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यापीठातील सर्व सहकारीवृंद (अध्ययनार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद) यांच्यासाठी, वाचन व लेखनातून समस्या निराकरण व्हावे म्हणून, **शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष** यांच्या संयुक्त विद्यमाने **"माझे वाचन निबंध लेखन"** स्पर्धेचे नियोजन केलेले आहे. **त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :**

१. विषय: माझे वाचन.
२. वेळ: १ तास.
३. निबंध लेखकांनी स्वतः शैक्षणिक इमारतीच्या सभागृहात किंवा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सहविचार सभागृहात १ तास स्वतः लेखन करणे अपेक्षित आहे.
४. गुणवत्तापूर्ण निबंधास प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिके ग्रंथ रुपात व प्रमाणपत्र स्वरूपता देण्यात येतील.

तरी जास्तीत जास्त सहकारी वृन्दांनी या निबंध स्पर्धेत सहभागी व्हावे. ही विनंती.


**स्थळ:** शैक्षणिक इमारतीच्या सभागृहात किंवा शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सहविचार सभागृहात.

कुलसचिव (प्र)
( भटूप्रसाद पाटील )

**प्रत :** माहितीसाठी मा. कुलगुरु यांचे कार्यालय
**प्रत :** उचित कार्यवाहीसाठी

1) सर्व विभाग/केंद्र /कक्ष /विद्याशाखा संचालक यांना विनंती की, हे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व सहकारी आणि अध्ययनार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
2) प्रमुख, जनसंपर्क कक्ष – सदरहू कार्यक्रमाचे प्रसिद्धी करावी.

# सहभागी सहकारी




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
॥ वाचन - लेखन प्रेरणा दिन पंधरवाडा ॥
शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष
आयोजित

**माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा**

| अ. क्र | संपूर्ण नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. | वाघेरे दर्शना तुकाराम | |
| २. | गायकवाड पुष्पा कचरु | |
| ३. | नूतन रविंद्र खालवे | |
| ४. | सोनवणे रिंकू लक्ष्मण | |
| ५. | प्राजक्ता सुनिल लोणारे | |
| ६. | कोमल मधुकर आढके | |
| ७. | टी. के. सोनवणे | |
| ८. | सूर्यवंशी रुपाली | |
| ९. | हेमलता खंडेराव कामडी | |
| १०. | स्वरांजली मिलिंद जाधव | |
| ११. | मंगल उत्तम निंबेकर | |
| १२. | हर्षाली मोतीराम पवार | |
| १३. | शारदा अमरनाथ निपळुंगे | |
| १४. | युवराज सिंह | |
| १५. | प्रमोद एन. पठारे | |
| १६. | | |
| १७. | | |
| १८. | | |
| १९. | | |
| २०. | | |
| २१. | | |
| २२. | | |
| २३. | | |
| २४. | | |
| २५. | | |
| २६. | | |
| २७. | | |
| २८. | | |
| २९. | | |
| ३०. | | |

# परीक्षक पत्रे व आभार पत्रे



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२
Ph. :0253-2231714,15 Ext 2002 http://-ycmou.diqitaluniversity.ac
e-mail : mwkchair@ycmou.ac.in
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**प्रेषक** : प्रा.विजयकुमार पाईकराव **विषय** : परीक्षक मान्यतेबाबत...

**प्रति** : मा. कुलगुरू **दि**: ३१/१०/२०२३

डॉ. ए.पी.जी अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन पंधरवडा निमित्त. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, संवाद पत्रिका व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने **"माझे वाचन निबंध लेखन"** स्पर्धा दि. २६/१०/२०२३ भारतीय सौर कार्तिक ४ शके १९४५ रोजी. विद्यापीठातील सर्व सहकारी वृंदासाठी आयोजित केली होती. या स्पर्धेच्या परीक्षणासाठी परीक्षक म्हणून खालील परीक्षकाच्या नावास मान्यता द्यावी ही विनंती. आदर व आभारासह!

१. डॉ. मधुकर शेवाळे, ग्रंथपाल
२. श्री. प्रेमनाथ सोनवणे, नोंदणी कक्ष

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन


मान्य

मान्य/अमान्य

31/10/23

मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
आवक क्र.: VC/3508
दि. 31/10/2023



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२
Ph.:0253-2231714, 15 Ext 2002 http://-ycmou.diqitaluniversity.ac
E-mail: mwkchair@ycmou.ac.in
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**प्रेषक** : प्रा.विजयकुमार पाईकराव **विषय** : आभार पत्र .....

**प्रति** : मा. श्री. प्रेमनाथ सोनवणे
नोंदणी कक्ष **दिनांक** : ३०/११/२०२३

डॉ. ए.पी.जी अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन पंधरवडा निमित्त. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, संवाद पत्रिका व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने **"माझे वाचन निबंध लेखन"** स्पर्धा दि. २६/१०/२०२३ भारतीय सौर कार्तिक ४ शके १९४५ रोजी. विद्यापीठातील सर्व सहकारी वृंदासाठी आयोजित केली होती. या स्पर्धेच्या परीक्षणासाठी परीक्षक म्हणून आपण दिलेल्या योगदानाबद्दल आपले मन:पूर्वक आभार !

**एक सुखद क्षण**
**सुगंधी, ज्ञानी अभ्यासपूर्ण**
**दरवळून टाकणारा**
**दाही दिशा तना मनाच्या**
**आकांक्षा आभाराची**
**पूर्ण व्हावी म्हणून**
**ही आभार शब्द सुमन माला.**
**उजळून दे दाही दिशा**
**आणि**
**वाढवू दे सीमारेषा**
**तुमच्या सहकार्याशील कार्यानंदी कर्तुत्वाच्या**
**हिच सुमंगल कामना ! आदर व आभारासह! मनपूर्वक धन्यवाद !!!**
**लोभ आहेच वृद्धी व्हावी...!!!**

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

O/C

आवक

30/11/2023

काही पारितोषिक प्राप्त निबंध

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

॥ वाचन - लेखन प्रेरणा दिन पंधरवाडा ॥

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

आयोजित

माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा

संपूर्ण नाव: स्नेहा अमरनाथ निवडुंगे

भ्रमणध्वनी:

अध्ययनार्थी (✓) / शिक्षक ( ) / शिक्षकेत्तर कर्मचारी ( ) / करारावरील कर्मचारी ( )

माझे वाचन

बालपण म्हणजे छंदांचा खजिना ह्याच खजिन्यातील माझा सर्वात आवडता खजिना म्हणजे. वाचन मला बालपणा पासून वाचनाची प्रचंड आवड मी घरात सर्वात लहान असल्यामुळे मला खूप गोष्टींची पुस्तक माझी आई. रोज झोपताना वाचून वाचून गोष्टी सांगायची ज्या दिवशी गोष्ट ऐकली नाही त्या दिवशी मला झोपच येत नसायची हळूहळू ती गोष्ट ऐकण्याची आवड. गोष्ट वाचण्यात केव्हा परिवर्तित झाली हे समजलेच नाही.

माझे वाचन प्रचंड असलेल्या मुळे मी शांत, स्वभावाची होती पण वाचनाच्या प्रचंड भांडार असल्या मुळे माझ्या कडे ज्ञान होते आणि मला त्या वाचन सागराच्या अगदी खोल पर्यंत जायचे आहे. मी आणि माझे वाचन रोज सकाळी उठल्या पासून ते झोपे पर्यंत मी काही ना काही वाचतच असते. वर्तमान पेपर, पुस्तके, इंटरनेट वरून माहिती मिळवून वाचन करते. पण बालपणाच्या वाचनात आणि बदलत्या वाचनाच्या शैलीत मला ही बदलावे लागले. लहानपणा पासून पुस्तक वाचन ही सवय होती पण आत.

आधुनिकाळात म्हणजेच तंत्रज्ञानाच्या काळात मी ही बदली मी दिवस दिवस मोबाईलशी जवळ असून मला आवडणाऱ्या त्या गोष्टी ती माहिती आणि आज जगात काय नवे बदल होत आहे. ह्या सर्व गोष्टी वाचन नवी आवड माझ्या मध्ये निर्माण झाली.

मी सोशल मिडिया वर म्हणजे इन्स्टाग्राम, फेसबुक इ. वर माझे खाते तयार केले आहे मी या खात्या वर वाचन, साहित्य विषय, माहिती देत असते. वाचन मला प्रिय असल्यामुळे मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, यांच्या विषयी मनात आदर बाळगते.

मला, कथा, कादंबऱ्या, एकांकिका, गोष्टींची पुस्तके, ग्रंथ, धर्मविषयी साहित्य वाचायला सर्वात जास्त आवडते. मी आणि माझे वाचन एक पारदर्शक चित्र आहे. मी एका शिक्षिका वाचनाविषयी माहिती दिली प्रेरणा दिली वाचन करून मोठे-मोठे स्वप्न पूर्ण करता येतात यांची त्या विद्यार्थ्यांना आवाहन दिले.

वाचनाची आवड ही महान असायला हवी. वाचनाचा छंद निर्माण झाला पाहिजे. ज्यावेळी तंत्रज्ञान हे मोठ्या प्रमाणावर विकसित नव्हते. तेव्हा माणसाला छंद आणि आवडीने पुस्तक वाचन करायचा पण आजच्या काळात तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्या वाचनाची छंद आणि आवड कमी झाली आहे. कुठे तरी वाचन आणि वाचन साहित्य कमी होत आहे कारण तंत्रज्ञान आणि माणसातील तंत्रज्ञाना विषयीचे आकर्षण.

आपण प्रत्येक मध्ये वाचनाची आवड कशी निर्माण करता येईल

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

॥ वाचन - लेखन प्रेरणा दिन पंधरवाडा ॥

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

आयोजित

माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा

संपूर्ण नाव: स्नेहा अमरनाथ निवडुंगे

भ्रमणध्वनी:

अध्ययनार्थी (✓) / शिक्षक ( ) / शिक्षकेत्तर कर्मचारी ( ) / करारावरील कर्मचारी ( )

यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सुरुवात ही स्वतःना पासून केली पाहिजे.

वाचन अमलात शाळा, कॉलेज व शासकीय कार्यालय आणि सार्वजनिक वाचनालया मध्ये केले पाहिजे. वाचन हे एका दिवसा पर्यंत म्हणजे वाचन प्रेरणा दिना पर्यंत मर्यादित नसून हा वाचन प्रेरणा दररोज साजरा केला पाहिजे. आपण तंत्रज्ञाना बरोबरच वाचनालाही महत्व दिले पाहिजे.

मी आणि माझे वाचन निरंतर चालणार कारण वाचाल तर च माणूस शिकेल।

संदर्भ मुद्दे - 06

शाब्दिक सौंदर्य - 06

मुद्देसूद मांडणी - 05

अनुक्रमणिका - 05

सर्वसाधारण - 07

21

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

॥ वाचन - लेखन प्रेरणा दिन पंधरवाडा ॥

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

आयोजित

### माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा

संपूर्ण नाव: टी. के. सोनवणे

भ्रमणध्वनी: 9325699159

अध्ययनार्थी ( ) / शिक्षक ( )/ शिक्षकेत्तर कर्मचारी ( ✓ )/ करारावरील कर्मचारी ( )

"वाचाल तर वाचाल" हे जीवनसूत्र माझ्या बाबतीत अक्षरश:, शब्दश: व शतप्रतिशत खरे ठरले आहे. वाचनामुळे मला कसा कसा लाभ झाला हे या निबंधाद्वारे मला अभिव्यक्त करायला मिळतेय ही एक सुवर्णसंधीच आहे.

माझे वाचन सुरू झाले हायस्कूल शिक्षणाबरोबर. माझे हायस्कूल व कॉलेज शिक्षण तेव्हाच्या ठाणे व आताच्या पालघर जिल्ह्यातील खोडाळा व मोखाडा या गावांमध्ये झाले. या दोन्ही गावांमध्ये पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य होते. मात्र येथील हायस्कूल व कॉलेजचे ग्रंथालय समृद्ध व सुसज्ज होते. १९७८ ते १९८८ या काळात या भागात बाबा कदम, व.पु. काळे, चंद्रकांत काकोडकर, गुरुनाथ नाईक आणि बाबुराव अर्नाळकर हे लेखक अतोनात विद्यार्थीप्रिय होते. त्यांच्या कादंबऱ्या, डिटेक्टिव्ह कथा प्रचंड वाचल्या जात होत्या. मात्र मी काय वाचायला सुरुवात केली? तर ते पुस्तक होते वि. स. आवे लिखित "महाराष्ट्र सारस्वत". या पुस्तकामुळे मला इ. ६वी पासूनच कथा, कादंबऱ्यांपेक्षा अशी समाज, संस्कृतीचे, इतिहासाचे विश्लेषण व विवेचन करणारी पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. ती आजतागायत टिकून आहे. याच आवडीतून पुढे फुले, आंबेडकरांचे लेखन समरसून वाचले. दलित कथा, काव्य, कादंबरी लेखनाची लाट किती प्रचंड होती ते या वाचनाच्या आवडीमुळेच कळले. दया पवार, प्र. ई. सोनकांबळे हे लेखक या वाचनातून कळले. दलितांच्या गाथा, व्यथा खोलवर काळजापासून अनुभवल्या. मी स्वत: याच अनुभवांतून गेलो असल्याने प्रत्येक वेळी एक वेगळीच अनुभूती येत गेली.

या वाचनप्रवाहात ग्रामीण साहित्यानेही समृद्ध भर घातली. शंकर पाटील, शंकर खरात, ना. धों. महानोर, अण्णाभाऊ साठे यांनी ग्रामीण जीवनाचे कमालीचे अनोखे दर्शन घडवले.

या वाचनाने अनेक जाणिवा विकसित झाल्या, समृद्ध झाल्या. वाचायचे असेल तर वाचलेच पाहिजे ही त्यातील सर्वात मोठी जाणीव होय. या जाणिवेमुळे हरप्रकारचे साहित्य वाचले. खांडेकर, कानिटकर, शिरवाडकर वाचले. फुलेंना कसे सोडणार. त्यांना वाचले नाही तर काय वाचले? असा प्रश्न काही मित्रांनी विचारला होता.

या वाचन प्रवासात सर्वाधिक वेळ दिला तो अर्थात फुले-आंबेडकर वाचण्यासाठी. यांचे स्वत:चे लेखन तर वाचलेच, परंतु या दोघांच्या बाबतीत इतर अनेकांनी जे समर्थनार्थ व विरोधार्थ लिहिले आहे तेही मोठ्या प्रमाणात वाचले. म. फुले यांचे प्रचंड पल्लेदार वाक्य म्हणजे शिवरायांची भवानी तलवारच होय अशी जाणीव आज होत आहे.

डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथांनी, संदर्भांनी भरगच्च, समर्थ वकिली बाण्याचे बिनतोड लेखन जीवनाचे सार्थक झाल्याची जाणीव देते. माझ्या आजोबा-पणजोबापासून ते आजच्या नातवंड-पतवंडापर्यंतची प्रत्येक पिढी बाबासाहेबांना बापाहून अधिक का मानते हे बाबासाहेबांचे लेखन वाचून कळले. रानावनातले, उकिरड्यावरले, पाण्यासाठी पायपीट मैल धावणारे, उन्हातान्हात रापणारे जीवन बाबासाहेबांचे, जोतिबा फुल्यांचे लेखन वाचल्याने उजळून निघाले ही एक जाणीव या वाचनातून आली.

मुक्त विद्यापीठात नोकरीला रुजू लागल्यावर येथील विश्लेषकांची पुस्तके वाचली. ग्रंथालय किती आधुनिक व सशक्त असते याची जाणीव मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालयाने करून दिली.

वाचनामुळे मला पत्रलेखन, निबंध लेखन, मसुदा लेखन या बाबतीत खूप लाभ झाला. चर्चा-संवाद करताना वाचनाचा ठायी ठायी उपयोग होतो. साक्षी-पुराव्यासह युक्तिवाद करता येतो हा वाचनाचा फार मोठा फायदा आहे.

प्रत्येकाने आपल्या आयुष्यात शक्य तेवढे अधिकाधिक वाचन करावे असे मी यानिमित्ताने आवर्जून सांगू इच्छितो.

वाचन संदर्भ मुद्दे - 06
आशय सौंदर्य - 05
हस्ताक्षर स्पष्टता - 07
मुद्दे अनुरूप - 07
सर्वसमावेशक - 07
32

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

॥ वाचन - लेखन प्रेरणा दिन पंधरवाडा ॥

शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय, संवाद पत्रिका,

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

आयोजित

### माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा

संपूर्ण नाव: श्री. प्रमोद एन. पठारे

भ्रमणध्वनी: 9520409173

अध्ययनार्थी ( ) / शिक्षक ( )/ शिक्षकेत्तर कर्मचारी ( )/ करारावरील कर्मचारी ( केंद्र संयोजक

'माझे वाचन'

'वाचाल तर वाचाल' या विचाराप्रमाणे आपण दररोज विविध विषयांचे वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे. वाचन संस्कृती जोपासण्याची, जीवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे परंतु सुधारणेची सुरुवात नेहमी स्वत: पासून केली पाहिजे. म्हणूनच मी वाचनाची सुरुवात स्वत: पासून केली पाहिजे. खरंच मी वाचतो का? किती वाचतो? कसे वाचतो? काय वाचतो? कशासाठी वाचतो अर्थात वाचनाचा हेतू उद्दिष्ट हे आम्हाला स्वत:ला अगोदर माहित असेल तर आम्ही आमच्या वाचन ध्येया-पर्यंत पोहचू शकतो.

वाचनाने माणूस बहुश्रुत होतो. त्याला त्याच्याजवळ असलेले ज्ञान समजते. तो इतरांना बऱ्याचशा चांगल्या गोष्टी देऊ शकतो. 'ज्ञान दिल्याने वाढते'. वाचन हे सहेतुक असले पाहिजे.

मराठी भाषेची कौशल्य जर आम्हास समजली (क्षमता) तर आम्ही एक उत्कृष्ठ समीक्षक, वाचक, लेखक, वक्ता अशा विविध स्थानांवर पोहचू शकतो. म्हणून मूळ वाचनाच्या अर्थात भाषेच्या क्षमता

आम्हास माहिती असाव्यात
1) श्रवण 2) वाचन भाषण-संभाषण
3) वाचन 4) लेखन.

ह्यातून आपली जडण-घडण होते आजचा मुख्य विषय 'माझे वाचन' हा आहे, तर माझे वाचन हे संस्कारक्षमता निर्माण करणारे पुस्तके वाचावेत थोर समाजसुधारकांचे चरित्र वाचावे आत्मचरित्र, प्रेरणा देणारे पुस्तके वाचावे. अर्थात त्यातून आपल्या व्यक्तीमत्वाची जडण घडण होते.

'विद्या विनयेन शोभते' वाचनातून माणूस समृद्ध होतो. विचारशील बनतो चारित्र्यसंपन्न बनतो. म्हणूनच माझे वाचन हे संस्कारक्षमता निर्माण करणारे असावे. त्यातून आदर्श मूल्य व आदर्श नागरिक निर्माण करण्याची क्षमता निर्माण होते. वाचनातून नवनिर्माण करण्याची क्षमता निर्माण होते.

'माझे वाचन' हे चरित्र, आत्मचरित्र, प्रेरणा देणारे साहित्य हे आहे.

संदर्भ मुद्दे - 4
आशय सौंदर्य - 3
[illegible] - 5
[illegible] - 4
सर्वसमावेशक - 4
20

अंतिम निकाल पत्र

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन



प्रेषक : प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रति : मा. कुलगुरू

विषय : माझे वाचन निबंध लेखन स्पर्धा अंतिम निकालाबाबत.....
दिनांक : २५/११/२०२३

कृ. माझे वाचन निबंध लेखन स्पर्धेचा अंतिम निकाल परीक्षण समितीने दिलेला आहे. त्यास मान्यता द्यावी. ही विंनती, आदर व आभारासह.!!!

| अ.क्र | सहकारीवृंद स्पर्धकाचे नाव | परीक्षक १ ५० | परीक्षक २ ५० | एकूण १०० | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वाघेरे दर्शना तुकराम | ३० | २२ | ५२ | उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र |
| 2. | गायकवाड पुष्पा कचरू | ३६ | २३ | ५९ | उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र |
| 3. | नूतन रवेंद्र साळवे | ४० | २४ | ६४ | तृतीय विभागून : दैनंदिन कर्मचारी |
| 4 | सोनवणे रवेंद्र लक्ष्मण | ३२ | २६ | ५८ | द्वितीय : नियमित कर्मचारी |
| 5. | लोणारे प्राजक्ता सुनील | २४ | २२ | ४६ | द्वितीय : बी. बी. ए अध्ययनार्थी |
| 6. | साळुंके कोमल मयुरेश | २४ | १८ | ४२ | तृतीय : बी. बी. ए कर्मचारी |
| 7. | सोनवणे टी. के. | ४४ | ३५ | ७९ | प्रथम : नियमित कर्मचारी |
| 8. | सूर्यवंशी रुपाली | ४० | २५ | ६५ | तृतीय विभागून : दैनंदिन कर्मचारी |
| 9. | कामडी हेमलता अंबादास | ३० | २० | ५० | उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र |
| 10. | जाधव स्वरांजली मिलिंद | ४३ | २८ | ७१ | प्रथम : दैनंदिन कर्मचारी |
| 11. | निंबेकर मंगल उत्तम | ३८ | ३० | ६८ | द्वितीय : दैनंदिन कर्मचारी |
| 12. | पवार हर्षाली मोतीराम | ३२ | २० | ५२ | उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र |
| 13. | निपळूंगे श्रद्धा अमरनाथ | ३२ | २९ | ६१ | प्रथम : बी. बी. ए अध्ययनार्थी |
| 14. | सिंह युवराज | १८ | १८ | ३६ | उत्तेजनार्थ गुणवत्ता प्रमाणपत्र |
| 15. | पठारे प्रमोद एन. | ३० | २० | ५० | प्रथम : अभ्यासकेंद्र कर्मचारी |

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

मान्य

मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/3637
दि. 25/ 11 /2023

प्रमाणपत्रे

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

'माझे वाचन': उत्स्फूर्त निबंध लेखन स्पर्धा



## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री. / श्रीमती पठारे प्रमोद एन.
यांनी महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा ग्रंथालय व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने, दि. २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी आयोजित 'माझे वाचन'
या उत्स्फूर्त निबंध लेखन स्पर्धेत अभ्यासकेंद्र गटात "प्रथम" क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांना सन्मानपूर्वक हे गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्रा. संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष आणि विद्याशाखा ग्रंथालय

श्री. दिलीप भरड
कुलसचिव

दि. 20 फेब्रुवारी, 2024

काही प्रकाशचित्रे


अपेक्षित अध्ययनार्थी
CHILD LINE 1098
संवाद


अपेक्षित अध्ययनार्थी
CHILD LINE 1098


अपेक्षित अध्ययनार्थी
१०९८ या क्रमांकावर संपर्क करा
CHILD LINE 1098
संवाद


अपेक्षित अध्ययनार्थी
१०९८ या क्रमांकावर संपर्क करा
CHILD LINE 1098
संवाद







प्रा. विजयकुमार पाईकराव

मा. कुलगुरू